# ।। चाणक को अंग ।।

# मारवाडी + मराठी

✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

## ।। अथ चाणक को अंग लिखंते ।।

।। चोपाई ।।

**ऋग यजु स्याम अथर्वण सोई ।। च्यारूं वेद कुवाय ।।**
**मोख मुक्त की गेल बिचारी ।। पसूवे वेद दिखाया ।।१।।**

ऋग्वेद,यजुर्वेद,सामवेद आणि अथर्ववेद असे हे चार वेद आहेत,परंतु ज्याने मोक्षाच्या रस्त्याचा विचार केला त्याने पशु जवळून(जसे ज्ञानदेवाने रेड्याच्या मुखातून,गोरक्षनाथाने मेलेल्या कुत्र्यापासून आणि शंकराचार्याने गाढवाच्या गुदाघाटाच्या रस्त्याने)वेदाचे उच्चारण करवले.।।१।।

**श्रोता बक्ता पिंडत जोसी ।। भूल रहया जग माही ।।**
**डाळ पान फूल फळ सेवे ।। गोड बिज गम नाही ।।२।।**

संसारात श्रोता(ऐकणारे),वक्ता(उच्चारण करणारे)पंडित आणि जोशी हे सर्व वेदात भूलून राहिले आहे.सर्व लोक झाडाची फांदी,पत्ते,फूल,फळाची सेवा करून राहिले आहे,परंतू झाडाची मुळ आणि बीजाची कोणालाही माहिती नाही की,आदि मूळ कोण आहे?।।२।।

**बाजी देख जक्त सब भूली ।। धन ले गांठ चढावे ।।**
**जन सुखराम बुद्ध बिन मुरख ।। बादी नाव सरावे ।।३।।**

जसे जादूगाराचा खेळ पाहून लोक भूलून जातात तसेच या सृष्टीचा कर्ता बाजीगराचा खेळ पाहून सर्व भूलून गेले.जसे जवळचा पैसा जादूगाराला देतात तसेच आदि सतगुरू सुखरामजी महाराज सांगतात की,बिना बुद्धीचे मूर्ख आहे,ते या बाजीगराची शोभा करतात.ज्या तऱ्हेने त्या बाजीगराची शोभा करतात की,खेळ चांगला केला याचप्रकारे या सृष्टीची रचना करणाऱ्या बाजीगराची शोभा करून त्याचे नाम भजतात.।।३।।

कवत ।।

**पथर मुरत कोर ।। आण देवळ मे मेंली ।।**
**वे भी पूजन जाय ।। कहे तुम व्हे ज्यो बेली ।।४।।**

दगडाची मूर्ति मनुष्याने घडवून बनविली आणि खरेदी करून आणून स्वत:च मंदिरात ठेवून दिली आणि त्या मूर्तिला खरेदी करून मंदिरात ठेवणाराच तिला पूजायला जातो आणि त्या मूर्तिला सांगतो की,तुम्ही माझी सहायता करा.।।४।।

**हातां लिवी बणाय ।। पूज नर नारी जावे ।।**
**मकड़ी माँडे जाळ ।। ऊलट फिर माहे बंधाये ।।५।।**

तर मनुष्याने हाताने दगड,धातू,चित्र,मातीची,वाळूची मनोमय रत्नाची,लाकडाची आठ प्रकाराने मूर्ती बनविली आणि तेच स्त्री–पुरुष त्या मूर्तिला पूजायला जातात.जसे मकडी जाळ बनवते आणि त्याच जाळेत ती फसून मरते तसेच या मूर्ती पूजेचा आपल्याच हातांनी बनवून स्वत:च त्याच्यात बांधून आपले अमुल्य श्वास गमवून देतात.।।५।।

**यूं भरम्यो संसार ।। देव सब मांड ऊपाया ।।**
**हाताँ क्रम कमाय ।। फेर भुक्तन कूं आया ।।६।।**

देव(ब्रम्हा,विष्णू,महादेव)यांनी सृष्टी उत्पन्न केली आणि या समजमध्ये संसारातील सर्व जीव भ्रमीत होऊन गेलेत.जीवाने हातांनीच कर्म केले आणि ते आपल्या हातांनीच केले गेलेले कर्म भोगण्याकरीता संसारात आले.जसे कातणी स्वत:च जाळ बनवून ती स्वत:च त्या जाळ्यात फसते, तसेच जीव आपल्या केलेल्या कर्मांमध्ये बांधला जातो.।।६।।

**धरीया घड़ीया देव रे ।। सब अनघड़ बस होय ।।**
**छिन पल करे तो सिष्ट ।। भस्म चुरण सब कोय ।।७।।**

तर हे घडविलेले आणि ठेवलेले देव हे सर्व अनघड देवाच्या वशमध्ये म्हणजे स्वाधीन आहे.तो अनघड देव या सर्व घडलेल्या देवांचा एका पळात चूरा करू शकतो म्हणजे सर्व देवांना व सृष्टीला भस्म व चूर्ण करू शकतो.।।७।।

**पल मे करे पेदास ।। छिनक मे सबे संघारे ।।**
**यूं घडीया सब घाट ।। सकळ अणघड़ के सारे ।।८।।**

तो अनघड देव एकाच पळात सर्व पैदा करतो आणि एकाच पळात सर्व संहार करुन देतो. असेच हे सर्व घडलेले घाट(आठ प्रकारच्या मूर्त्या)त्या अनघडच्या ताब्यात आहे.।।८।।

**सुर्गूण नाव अनंत ।। तांही गिणती नही जाणी ।।**
**ब्रम्ह एक निरधार ।। तांही की नही पिछाणी ।।९।।**

सगुण देवांचे अनन्त नाम आहे,त्याची गणती कोणाकडूनही होत नाही.सतस्वरूप ब्रम्ह एकच आहे,परंतु त्याचा निर्धार करून,त्याची ओळख कोणी करीत नाही.।।९।।

**देहे लगे साचा नाम ।। पूज सेवे तन सोई ।।**
**ब्रिछ बिना के छाँय ।। जड मुरख नर होई ।।१०।।**

हा देह आहे तोपर्यंत या देहाचे नाम खरे आहे.या तनाची म्हणजे शरीराची पूजा करून सेवा करणे बरोबर आहे,परंतु जेव्हा वृक्षच नाही आहे तर त्याची छाया कोठून येणार? तसेच देह नाही तेव्हा त्याचे नाव वृक्षाशिवाय छाये सारखे आहे तसेच दगडाची बनविलेली मेलेल्या देवताची मूर्ती मूर्ख मनुष्याकरीता आहे.।।१०।।

**गेणो भांज मिटावीयो ।। क्हा नाँव क्हे कोय ।।**
**देहे पड़याँ सुखराम के ।। सबे नाव इम होय ।।११।।**

दागिना तोडून वितळवून टाकला,परत वितळलेल्या धातूला दागिन्याचे नाव कोण सांगेल? त्याच तऱ्हेने हे शरीर मिटल्यावर शरीराचे सर्व नाव तोडलेल्या दागिन्यासारखे आहे, असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज सांगतात.।।११।।

दोहा ।।

**गऊँ बछडयो मर रहयो ।। कियो महुऱ्यो लोय ।।**
**ग्यान समज बिन बाहेरी ।। धूमर चाटे जोय ।।१२।।**

गाईचे वासरू मरून गेले,त्या वासराच्या पुतळ्याला(गाईचे वासरू मरून गेल्यावर ती गाय वासरा शिवाय दूध देत नाही तेव्हा त्या मेलेल्या वासराची हाडे,मास काढून त्याच्यात भूसा भरून शिवून देतात आणि ते गाईच्या पुढे ठेवून देतात.ती गाय त्याला आपले जिवंत वासरू समजून चाटते आणि दूध द्यायला लागते.हा पूतळा बनविण्याची चाल मारवाड देशात आहे.तिथे नीच लोक घोंसी वगैरे जातीचे लोक पुतळा बनवतात),त्या गाईला ज्ञान आणि समज नसल्या कारणाने ती गाय त्याला चाटते याच प्रकारे ज्ञान आणि ज्यांच्यात नाही,ते मनुष्य मेलेल्या देवांचे किंवा संतांचे,जसे ती गाय आपले वासरू जिवंत आहे,असे समजते तसेच हे देवांच्या आणि संतांच्या नंतर गाईच्या पुतळ्या सारखे करतात. ।।१२।।

**बाळक केता संग रमे ।। करे जक्त को ख्याल ।।**
**खान पान सब बिसरे ।। रम क्या हूवे न्याल ।।१३।।**

जसे मुले(मुलगा–मुलगी)सोबत खेळून संसाराचे सर्व खेळ खेळतात.(जसे शेती करतात, घर बनवतात,लग्न करतात,बाहुली सोबत खेळतात वगैरे सर्व खेळ खेळतात)या खेळात खाणे–पिणे सर्व विसरून जातात,परंतु खेळून संतुष्ट होतात का?त्यांनी शेती केली, त्याचे पीक काही येत नाही,घर बनवले,ते राहण्याच्या उपयोगात येत नाही,लग्न करतात तर स्त्री घरी येत नाही आणि मुलही काही होत नाही तसेच हे सर्व छोट्या मुलांसारखे संसारात मोठे मनुष्य भक्ति करतात.ते मुलांच्या खेळासारखे करतात.।।१३।।

**काठ पुतळी मांड कर ।। नार संग ले सोय ।।**
**सुर्गुण ईम सुखरामजी ।। तामे फेर न कोय ।।१४।।**

तर आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्या मनुष्याला स्त्री नसेल तो लाकडाचा पुतळा बनवून त्याला दागिने घालून आपल्या सोबत घेऊन झोपला तर ती स्त्रीचे काम देईल का?तसेच हे सगुण मूर्ती,मोक्ष देण्याचे काम करू शकत नाही.याच्यात काही फरक नाही.।।१४।।

कवित ।।

**छुछम बेद बिन भेद ।। गत पिंडत नही होई ।।**
**चाल हाल नर नार ।। ग्यान सब ही को ओई ।।१५।।**

या सूक्ष्म वेदाच्या भेदाशिवाय,अरे पंडित,गती होणार नाही.सर्व स्त्री–पुरुषांची गती न होण्याचेच हालचाल आहे.सर्व स्त्री–पुरूषांना गती न होण्याचेच ज्ञान आहे.।।१५।।

**हिल मिल रहे हिजूर ।। ओर न्यारी नही सूझे ।।**

प्रदेसी की बात ।। आण प्रदेसी बुझे ।।१६।।

सर्व हिळून–मिळून पंडिताच्या ज्ञानात सन्मुख राहतात.त्यांना पंडिताच्या ज्ञानाशिवाय दुसरे काहीही दिसत नाही.दुसऱ्या देशवाल्याची गोष्ट ऐकून परदेशी विचारतो.।।१६।।

क्हा क्हे ऊण देस की ।। सुख संपत वो आंय ।।
पिडंत संग सुखरामजी ।। रहयो जक्त ऊळ झाय ।।१७।।

तर तो त्या देशाची गोष्ट ज्याला माहित नाही,त्याला त्या देशाचे सुख आणि संपत्ती तो कसे सांगेल?ज्या देशाची पंडिताला गोष्ट माहित नाही,मग त्या देशाची गोष्ट पंडित कशी सांगेल?या पंडिता सोबत सारे जगत गुरफटले आहे.हाराच्या दुकानावर हिऱ्याला चाहणारा अडकलेला राहतो परंतु हिरा काही तेथे मिळत नाही.अशा प्रकारे पंडितांच्या संगतीत मोक्ष नाही.।।१७।।

दालद्री ढिग जाय ।। आण निर्धन घर कीया ।।
नार उधारे जाय ।। क्हा धन काडर दीया ।।१८।।

जसे दरिद्रीच्या जवळ जाऊन निर्धनने घर बनविले आणि त्या निर्धनची पत्नी उधार मागण्याकरीता गेली तर तो दरिद्री त्याला धन काढून कोठून देईल?अशाप्रकारे पंडिताच्या जवळ संसारातील लोकांची बुद्धी मोक्षाची चाहणा(इच्छा)करतात,परंतु त्याच्या जवळ मोक्ष नाही आहे तर तो मोक्ष कोठून देईल,मोक्ष तर संताजवळ राहतो.।।१८।।

अंधे अंधो लार ।। पंग पंगे संग होई ।।
त्रिया म्हेरी संग ।। काज अेको नही कोई ।।१९।।

आंधळा मनुष्य आंधळ्या सोबत किंवा पंगू मनुष्य पंगू सोबत जाण्याने काय सुख मिळवते?तसेच स्त्री ने स्त्री सोबत लग्न केले तर त्या स्त्रीचे एक ही सुखाचे काम होत नाही तसेच जीव आणि ब्रम्हचे समजा.।।१९।।

सपना मे संपत मिले ।। राज पाठ सुख धाम ।।
निर्गुण बिन सुखराम के ।। यूं सुर्गुण बे काम ।।२०।।

स्वप्नात खूपशी संपत्ती मिळून गेली,राजगादी मिळून गेली,सुख मिळून गेले,घर मिळून गेले,परंतु स्वप्न तुटताच सर्व सुख चालले जाते असेच निर्गुणाच्या शिवाय सगुण भक्ती स्वप्नातील संपत्ती सारखी काही कामात येत नाही असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज सांगतात.।।२०।।

सुर्गुण देही जाण ।। झुट साची नही कोई ।।
जन सुखियां देहे जाय ।। नाम साचो किम होई ।।२१।।

सगुण हा देह आहे,तो मरतो म्हणून खोटा आहे,सत्य नाही म्हणजे अमरलोकाच्या न मरणाऱ्या अमर देहासारखा नाही.हा देह जाईल तेव्हा देहाचे नाव ही जाईल तेव्हा देहाचे

नाम सत्य कसे होईल?।।२१।।

छुछम बेद सुण भेद ।। जाण देवत नही पाया ।।
कव पंडीत पच जाय ।। भेद का मरम न आया ।।२२।।

सुक्ष्म वेदाचा भेद देवता म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेव शक्ती,इंद्र,इत्यादी देवांनाही मिळाला नाही मग कवी(शुक्राचार्य)पंडित हे पचून पचून थकून जातात,शरीर सोडून देतात तरी ही याचा मर्म कोणालाही(कवी व पंडितांना)मिळत नाही.।।२२।।

डाळा पान गंभीर ।। पेड़ फळ फूल बखाणे ।।
ईण सब ही का मूळ ।। ताही गत बिरळा जाणे ।।२३।।

हे सर्व झाडांच्या फांद्या,पत्ते,अगाऱ्या,झाड(डहाळे,तना)फळ,फूल यांचे वर्णन करतात, परंतु फांद्या,पत्ते,डहाळ्या,तने,फळ,फुल वगैरे या सर्वांच्या मुळाची गती हे कोणी जाणत नाही,या मूळाची गती कोणी विरळाच जाणतो.।।२३।।

भ्रम्यो सो सेंसार हे ।। च्यार बेद के माय ।।
छुछम बेद सुखराम के ।। पिंडत कूं गम नाय ।।२४।।

चारी वेदांच्या जाळ्यात सर्व जगत भ्रमीत म्हणजे भुललेले आहे.या सूक्ष्म वेदाची माहिती पंडिताला ही नाही.।।२४।।

दोहा ।।

राजा रंक सुलतान सब ।। बंध्या बेद मुख माय ।।
काजी मूल्ला बादस्या ।। आलम दुनि बंधाय ।।२५।।

राजा आणि रंक तसेच सुलतान हे सर्व वेदाच्या मुखात म्हणजे जाळात बांधलेले आहे. काजी काय मुल्ला काय,बादशहा काय,सारा आलम काय आणि दुनिया काय हे सर्व वेदात बांधले गेले आहेत.।।२५।।

तीन लोक चवदा भवन ।। ज्हाँ तहाँ हुवे बखाण ।।
पवन पाणी धरतरी ।। बंधी बेद प्रवाण ।।२६।।

तीन लोकात आणि चौदा भवनांमध्ये वेदाचे जेथे तेथे वर्णन होत असते.हे पवन(हवा) व पाणी आणि धरती हे सर्व वेदाच्या प्रमाणाने बांधले आहे. ।।२६।।

तीन लोक देख्या सही ।। अरथ निगम पढ जोय ।।
पिंडत कूं सुखराम के ।। छुछम बेद क्हो मोय ।।२७।।

आदि सतगुरू सुखरामजी महाराज पंडितांना सांगतात की,पंडितांनों तुम्ही वेद शिकून वेदाच्या अर्थात तिन्ही लोक पाहून घेतले.हे पंडितांनो तुम्ही मला सुक्ष्म वेद काय आहे? ते सांगा.।।२७।।

कवत ।।

छुछम बेद बिन जाण ।। आण बोले सब बाणी ।।

कूटे सबे पराळ ।। कूप सींचे बिन पाणी ।।२८।।

या सुक्ष्म वेदाशिवाय दुसरे सर्व जे मुखाने बोलतात,ते भुश्यासारखे(अन्न काढलेला कुटार) आहे.कुटार कुटल्याने त्यातून अन्न निघत नाही तसेच कोरड्या विहिरीतून पाणी निघत नाही तसेच सुक्ष्म वेदाशिवाय दुसऱ्या सर्वांनी मोक्ष होत नाही. ।।२८।।

दूले बिना बरात ।। बिज नाकूँ बिन बायो ।।
कँवळ कूख बिन नार ।। ब्याव प्रणे घर लायो ।।२९।।

नवरदेवाशिवाय वराती जसे असतात व बिना नाकाचे बीज शेतात पेरण्यासारखे असते. तसेच सुक्ष्म वेदाशिवाय दुसरे सर्व वेद आहेत.जसे पुरुषांमध्ये हिजडे असतात तसेच स्त्रियां मध्ये ही हिजडे असतात त्या हिजड्याशी लग्न करून त्याला घरी आणल्याने,आणणाऱ्या गृहस्थाला पुत्र लाभ होण्याचे सुख मिळत नाही.।।२९।।

गोळी बिना आवाज ।। तुपक ब्हो सोर ऊडावे ।।
जन सुखिया बिन भेद ।। पिंडत बक जनम गमावे ।।३०।।

बंदूकीत गोळी न टाकता केवळ बारूद टाकून आवाज करून दिला तर त्याच्याने कोणती शिकार मरत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असेच हे पंडित लोक सुक्ष्म वेदाच्या भेदाशिवाय बकवास करून कथा करतात.पंडितांच्या या बकवासाने कोणीही मोक्षाला जात नाही आणि वाद विवाद करून आपला आणि दुसऱ्यांचा जन्म गमावून देतात.।।३०।।

छुछम वेद को नाव ।। भेद कोऊं आण सुणावे ।।
बिन दिपक बिन तेल ।। जोत पर जोत जगावे ।।३१।।

या सुक्ष्म वेदाच्या नावाचा भेद कोणी मला येऊन सांगेल तर तो दिव्याशिवाय आणि तेलाशिवाय ज्योतीच्या वर ज्योती जागृत करेल असे समजा. ।।३१।।

नदीयां बहे सपूर ।। जोर सिलता ब्हो भारी ।।
हिल मिल अेके होय ।। घाट सो कहो बिचारी ।।३२।।

नदीचा पूर खूप जोराने वाहून राहिला आहे.ती नदी मोठ्या नदीला मिळाल्याने मोठ्या नदीला खूप भारी जोर येऊन जातो.त्या मोठ्या नदीमध्ये सर्व नद्या हिळून मिळून एक होऊन जातात.त्या घाटांचा म्हणजे पूराचा विचार करून सांगा.।।३२।।

पाँचू परखे नाय ।। बेण बायक नही जावे ।।
जन सुखिया वा जाग ।। जोय कोई मोय सुणावे ।।३३।।

पाची इंद्रीये परीक्षा करु शकत नाही व तेथे वचन वाक्य जाऊ शकत नाही,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ती जागा पाहून मला सांगा.।।३३।।

दोहा ।।

वा जागा असी कही ।। निर्भे भे नही कोय ।।
कयाँ सुण्या माने नही ।। देख्यां ही सुख होय ।।३४।।

ती जागा अशी सांगितली आहे की,ती जागा निर्भय आहे,तेथे भय कोणाचेही नाही. तेथील गोष्ट सांगितल्यावर कोणी ऐकून मानणार नाही.ती जागा तर बघितल्यावरच सुख होईल.।।३४।।

कवत ।।

जक्त भेष पिंडत सबे ।। किणी पार ना पाया ।।
असा अनघड देव तज ।। धरीये संग आया ।।३५।।

जगत व वेष(साधू,वैरागी व पंडित)कोणालाही त्या जागेचा पार नाही मिळाला.हे जगत, साधू,पंडित,वैरागी,अनघड देव सोडून देह धारण करून आलेल्या अवताराला भजतात. ।।३५।।

देहे धर जुग औतार ।। ब्रम्ह वे अगम बतावे ।।
ब्रम्हा बिस्न महेष ।। सेंस जाँकू नित गावे ।।३६।।

रामचंद्र,कृष्णादिक हे देह धारण करून संसारात येतात आणि सतस्वरूप ब्रम्ह जो अगम आहे.त्या अगम ब्रम्हला ब्रम्हा,विष्णू,महादेव आणि शेष नित्य भजतात.।।३६।।

निर्गुण ब्रम्ह विचार ।। जोय तेरे घट माई ।।
ज्हाँ तहाँ करे सहाय ।। ग्यान कहे आद गुसाई ।।३७।।

त्या निर्गुण ब्रम्हचा विचार केला तर तो तुमच्या शरीरातच आहे,त्याला या शरीरातच पहा.तो जेथे-तेथे तुमची सहायता करतो आहे,ज्ञान सांगतो आहे.तो आदिचा तुमचा स्वामी म्हणजे मालक आहे.।।३७।।

बिन देही आकार ।। अलख खावंद सो कहिये ।।
सो तेरे तन माय ।। भूल ओटे क्यूं जईयो ।।३८।।

तो बिना देहाचा आहे,त्याला देह नाही,आकार नाही,अलख आहे.तो दिसत नाही,खाविंद सर्वांचा मालक आहे.तो तुमच्या शरीरातच आहे.त्याला सोडून,भुलून तुम्ही दुसरीकडे कशाकरीता जातात.।।३८।।

चलतां देवल पूज ।। पेम सूं प्रीत बंधावे ।।
सूने घर सुखराम ।। पावणो क्या सुख पावे ।।३९।।

तर तुम्ही चालते फिरते मंदिर म्हणजे संतांना पूजा,त्या संतांशी प्रेमाने प्रिती बांधा.सूने घर म्हणजे जेथे सदेही संत नाहीत अशा संतांचे धाम,मंदिर,छत्री,चबूतरा अशा उजाड घरात जाऊन,पाहूणा म्हणजे जीव काय सुख पावेल?।।३९।।

धणी गया प्रदेस ।। जाग झाड़े नर नारी ।।

बिन राजा रजपूत ।। जूंझ करे मरे बिचारी ।।४०।।

धनी म्हणजे संत सतपुरुष तर परदेशाला म्हणजे मोक्षाला चालले गेलेत,आता त्यांच्या मागे कोणी स्त्री–पुरुष त्या जागेला झाड पोछ करेल व संतांची नित्य गाथा गाईल तर त्याला मोक्ष मिळणार नाही.मोक्ष देणारे साधू तर मोक्षाला चालले गेले तर हे असेच आहे जसे राजा नाही राहिला अशा राजाशिवाय राजपूत जुंझून मरून गेला,तर त्याला जहाँगीरी कोण देईल?याचा तुम्ही विचार करा.।।४०।।

कण बिन जावे खेत ।। जीव ब्हो भाँत ऊड़ावे ।।

पात फूल फळ नाय ।। बांग कूं नीर पिलावे ।।४१।।

शेतात झाडाला दाणे तर आले नाही आणि जाऊन अनेक तऱ्हेचे पक्षी उडवतो,अशा शेतात दाणे कोठून मिळणार,असेच संत सतपुरुषाशिवाय मोक्ष कुठून मिळणार?ज्याला ज्ञान,ध्यान नाही आणि विवेक नाही अशा साधूला भोजन देऊन त्याची सेवा करणे हे ज्याच्यात पत्ते,फूल–फळ नाही,अशा बागेला पाणी देण्यासारखे आहे.।।४१।।

गाय भेंस को करक ।। ताय का जतन करीजे ।।

पारी भर सुखराम ।। दुध कितरो यक लीजे ।।४२।।

तसेच कोणी दुध देणारी चांगली गाय किंवा म्हैस होती,ती मरून गेली.तीच्या मेल्यावर तिची हाडे जतन करुन ठेवली तर ती हाडे दूधाने गुंडी भरुन देते का?जसे ती हाडे दूधाने गुंडी भरून देत नाही,अशाप्रकारे सतपुरुषांचे मोक्षास जाने झाल्यावर त्यांचे केस,नख, दात,दाढी,कपडे तसेच अस्थी यांची पूजा केल्यावर मोक्ष मिळू शकत नाही,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४२।।

बेळु खळ पिलाय ।। छांछ कूं खरी बिलोवे ।।

बांझ नार कूं सेव ।। बस्त बिन मेल्यो जोवे ।।४३।।

वाळू आणि खळी(ढेप)घाण्यात टाकून पिळल्याने तेल निघत नाही तसेच तीर्थ,व्रत व देवपूजा केल्याने काहीही मिळत नाही.ताकाला कितीही घुसळले तरीही लोणी निघत नाही,तसेच वेदाला खूप वेळा वाचले आणि त्यातून अर्थ शोधला तरी ही मोक्ष मिळत नाही.त्याच तऱ्हेने वांझ स्त्री म्हणजे ज्यांला जीव तारण्याचा ओहदा नाही,अशा साधूची सेवा केल्याने भवसागर तिरण्याचे फळ प्राप्त होत नाही.आदि सतगुरू सुखरामजी महाराज सांगतात,वस्तु ठेवली तर नाही आणि ती वस्तु पाहून राहिला आहे म्हणजे शोधून राहिला आहे,तर ठेवल्याशिवाय तेथे ती वस्तु कशी मिळेल? ।।४३।।

धन बिन मांडे खत ।। रूंख बिन फळा चडीजे ।।

जाळ बिन कुवो जोड़ ।। कर्ण बिन हेला दीजे ।।४४।।

जवळ रुपये तर नाही आणि दुसऱ्याकडून दस्ताऐवज लिहून घेतो.ज्या वृक्षावर फळ नाही,

अशा वृक्षावर चढून फळ शोधतो आहे.असेच गिरनार, आबू, समेद शिखर, पादीगणा, मुक्तागिरी,सोनागिरी,पावापुर,शंत्रुजया जाणे आणि तेथे तिर्थंकर नाही आहेत तरीही तिर्थकरांना शोधणे हे आहे.बिना फळाच्या वृक्षावर चढणे,बिना पाण्याच्या विहिरीवर मोट जोतणे आणि कान नाही अशा बहिऱ्याला हाक मारणे हे गिरनार,आबू,समेद शिखर, पादीगणा,मुक्तागिरी,सोनगिरी,पावापुर,शंत्रुजयावर जाऊन तिर्थंकर शोधण्यासारखे आहे. ।।४४।।

बादस्याहा बिन तक्त ।। सेव कोई पटा कडावे ।।
सुर्गुण यूं सुखराम ।। मोख कबहू नही पावे ।।४५।।

जसे बादशहा होता तो तर राहिला नाही,त्याच्या नंतर त्याचा सिंहासन आहे तर सिंहासनाची सेवा केल्याने कोणाला जहाँगिरी मिळेल का?तसेच संत तर मोक्षाला चालले गेले,ते संत येथे नाहीत परंतु त्यांचा पाट आहे.त्या पाटाची सेवा करून मोक्षाचा पट्टा कोणाला मिळेल का?तसेच सर्व सगुण म्हणजे पगले,चरण,मूर्ती,फोटो पादुका,घड्याळ, ढोल्या,धुणी,खडावू,गोदडी,चोला,घरडी,आस याच्याने मोक्ष कधीही मिळणार नाही,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।४५।।

ध्रम पुन्न जिग जाग ।। जप तिर्थ सब कीया ।।
ब्रत वास ऊपवास ।। चित्त प्रमारथ दीया ।।४६।।

असेच धर्म,पुण्य,यज्ञ,योग,जप,तप,तीर्थ सर्व केले,व्रत-उपवास खूप केले आणि परमार्थ करण्यावर चित्त दिले.।।४६।।

तपस्या करे करूर ।। सील सो जत्त कमावे ।।
प्रमार्थ के काज ।। जाय ब्हो जाग बिकावे ।।४७।।

आणि खूप घोर तपस्या केली,शीलव्रत(ब्रम्हचर्य)ठेवून जत्त कमविले आणि परमार्था करीता अनेको जागी जाऊन विकला गेला तर हे सर्व केलेले काहीही व्यर्थ जाणार नाही.या सर्वांचे फळ मिळतील.।।४७।।

तीन लोक चवदा भवन ।। जा तहाँ अे फळ खाय ।।
जन सुखिया बिन नाव रे ।। मोख कबू नही जाय ।।४८।।

या सर्वांचे तिन्ही लोक व चौदा भुवनामध्ये जेथे-तेथे जाऊन याचे फळ भोगेल परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,यांचे फळ तर भोगतील परंतु नामाचे भजन केल्याशिवाय मोक्षास कधी जाणार नाही.।।४८।।

दोहा ।।

नाव कहे सुखरामजी ।। केवळ ब्रम्ह विचार ।।
धरी देहे सब झूठ हे ।। माया को विस्तार ।।४९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कैवल्य ब्रम्हच्या नावाचा विचार करा आणि हे दुसरे जे देह धारण करुन अवतार आले,ते–ते सर्व ही अवतार खोटे आहेत.हे देह धारण करून येतात,ते सर्व मायेचे विस्तार आहेत.।।४९।।

**धरी देहे सुणज्यो तुम सब ही ।। मे बिग्यान बताऊं ।।**
**क्रणी क्रम अेक नही साझूं ।। निजपद माँय समाऊं ।।५०।।**

आता तुम्ही सर्व ऐका,मी ही देह धारण केला आहे.मी आपल्या देहाच्या योगाने तुम्हाला विज्ञान सांगतो.मी कोणतीही करणी न करता,कर्म न करता,एकही साधना न करता निजपदाला जाऊन मिळून गेलो आहे.।।५०।।

**सुर्ग नर्क दोनू सुख झूटा ।। जूवा खेल मंडाया ।।**
**जाय जीत ब्होता धन लेवे ।। कब सो गांठ गमाया ।।५१।।**

स्वर्गाचे आणि नर्काचे दोन्ही सुख खोटे आहे.हे जुगाराच्या खेळासारखे आहे.जिंकून गेलो तर खूप धन येते आणि हारुन गेल्यावर जवळचेही गमावून देतो.।।५१।।

**बर्णा अबर्ण क्हे जग माही ।। पिंडत करे बिचारा ।।**
**जन सुखराम बंध्या जम तांती ।। हे ईनसूं कोई न्यारा ।।५२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे सर्व चारी वर्णाचे लोक यमाच्या दावणीला बांधले आहे.हे सर्व पंडित विचार करा.यमाची तात म्हणजे दावणी पासून एखाद संत निराळा आहे.याचा पंडितांनो विचार करा.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज पंडितांना सांगत आहे. ।।५२।।

**ब्रम्ह बेद दोनू जग ऊला ।। रिख जग सबे भुलाया ।।**
**दोनू पखाँ बिचे सब जूंझें ।। ब्रम्ह भेव नही पाया ।।५३।।**

ब्रम्ह आणि वेद या दोघांपासून जगत इकडेच आहे,असे सांगून अठ्ठ्यांशी हजार ऋर्षींनी या साऱ्या संसाराला भूलवून दिले.सतस्वरूप ब्रम्हच्या भेदाकरीता या दोन्ही पक्षांच्या मध्ये सर्व झुंजत आहेत परंतू सतस्वरुप ब्रम्हचा भेद कोणालाही मिळाला नाही.।।५३।।

**श्रृति कहे मून गहे साझे ।। जग हुन्नर सब लोई ।।**
**जेसे मंडया लाव लस्कर मे ।। सबे एक घर होई ।।५४।।**

कोणी वेदाची स्तुती सांगतो तर कोणी मौन साधतात,तर कोणी जगाचा हुन्नर करतात. जसे एका घरातच चित्र बनविलेले असते ज्यात दोन्ही बाजूच्या फौजा एकाच घरात असतात. ।।५४।।

**त्रिया पुर्ष भ्रम मिल दोनू ।। साच अेक नही आया ।।**
**जन सुखराम केण कूं दीया ।। जेड़ गुगरा साया ।।५५।।**

स्त्री आणि पुरुष दोन्ही मिळून भ्रमीत झालेले आहेत.विश्वास एकालाही आला नाही तसेच

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सोनाराला दागिना बनविण्या करीता सोने दिले,त्याचे त्याने दागिने व घागऱ्या वगैरे वेगवेगळे बनविले.।।५५।।

**घडयो घाट गागरी माटो ।। न्याव कुलाल बणाया ।।**
**सबका नाँव ठाम सब सारा ।। यूं जग मोय लखाया ।।५६।।**

तसेच कुंभाराने घागर,रांजण वगैरे भांड्याना बनविले व भांड्यांना नाव वेगवेगळे ठेवले अशा प्रकारे हा संसार मला दिसला.।।५६।।

**सब ही नाव ठांव सब केणी ।। कारज सूं ले कीया ।।**
**समझ्या पछे अेक है सांचो ।। जमी आद दै लिया ।।५७।।**

सर्व भांड्याचे नाव ते भांडे पाहून त्या कामात येतील.त्याच्या कार्याच्या प्रमाणाने ते-ते नाव ठेवले,परंतू जेव्हा हे समजमध्ये येईल की हे सर्व मातीचे आहे म्हणजे पृथ्वीपासून बनविले गेले आहेत म्हणजे सुरवातीला पृथ्वी होती आणि शेवटी ही या भांड्यांची पृथ्वीच होईल.।।५७।।

**किया ज्हाँ मिल्या सब माही ।। आतर ढेल सरीसा ।।**
**घडीयाँ ज्हाँ किया तिण ऊपर ।। चडे पडे तां पीया ।।५८।।**

ही भांडी आधी ज्या पृथ्वी पासून बनविले गेले होते.ते पुन: पृथ्वीत जाऊन मिळून जातील.हे कामाचे भांडे आणि पृथ्वी पासून वेगळा झालेला मातीचा ढेकळ हे सारखेच आहेत.ज्या पृथ्वीवर बनविले गेले ते पृथ्वीच्या वर चढून पृथ्वी पासून वेगळे होवून,पुन: फुटून पृथ्वीत मिळून गेले.।।५८।।

**ज्यूं तर पात पान सब हुवा ।। डाळी डाळ कहाणी ।।**
**निश्चे जाय मिले धर माही ।। ज्हाँ ते बीज ऊपाणी ।।५९।।**

जसे वृक्ष झाले ते पृथ्वी पासूनच निघून झाले.त्यांच्या ड्हाळ्या,फांद्या,पत्ते सर्व वेग-वेगळे म्हणविले परंतु हे सर्व जमिनीतूनच निघालेले आहेत.ते निश्चितच पुन्हा जमिनीतच जाऊन मिळतील.जेथून बीज उत्पन्न झाले,तेच जमिनीत सर्व जाऊन मिळून गेले.।।५९।।

**क्रसो जाय करे जो खेती ।। माळ माळ कण कीया ।।**
**फूली फळी पाक ज्हाँ आई ।। भरी आण ज्हाँ लीया ।।६०।।**

जसे शेतकरी शेती करतो आणि जंगलात एक एक दाणा वेग-वेगळा टाकून येतो.ती शेती फुलून फळेल आणि पीक येईल ते पुन्हा जेथून बीज घेतले होते तेथेल्या तेथेच पुन्हा भरुन देईल.।।६०।।

**साहूकार बिणज सो कर हे ।। घर घर दाम बिखेरे ।।**
**जन सुखराम लिया ज्हाँ मेले ।। ब्याज समुळा घेरे ।।६१।।**

जसे सावकार वाणिज्य(घेणे-देणे)करतो आणि घराघरात रुपये विखरून देतो तेच रुपये

व्याजासगट घरी आल्यावर आधीच्या जागी व्याज मुद्दला सोबत पुन्हा ठेवून देतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।६१।। ।। इति चाणक को अंग संपूरण ।।